# भाई भगवानराव पाटील यांचे जीवन व कार्य

**डॉ. विवेकानंद राजाराम माने,** इतिहास विभागप्रमुख, क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल जि. सांगली

**प्रस्तावना:**

भगवानराव पाटील यांनी देशाच्या स्वातंत्र्ययुध्दात बहुमोल कार्य केले. प्रतिसरकारमध्ये क्रांतिसिंह नाना पाटलांच्या समवेत इंग्रज सरकारविरूद्ध भगवानराव पाटील यांनी दंड थोपटले होते. भगवानराव पाटील यांचा जन्म दि. १० फेब्रुवारी, १९१८ रोजी त्यांच्या आजोळी नेवरी या गावी झाला. त्यांचे मोरे घराणे हे हणमंतवडिये या गावचे प्रतिष्ठित मराठा घराणे म्हणून ओळखले जाते. १९४० साली भगवानराव पाटील यांचा विवाह क्रांतिसिंह नाना पाटील यांची मुलगी हौसाबाई यांच्याशी सुधारक गांधीलग्न पध्दतीने, पण भागातील शेकडो लोकांच्या उपस्थितीत व स्वामी रामानंद भारती आदी नेत्यांच्या आशीर्वादाने संपन्न झाला.[१]

**स्वातंत्र्यलढ्यातील कार्य :**

भूमिगत चळवळीत भगवानराव पाटील यांनी अगदी सुरूवातीच्या काळापासून भाग घेतला. प्रारंभी चळवळीतील एक सामान्य कार्यकर्ता म्हणून त्यांनी काम केले. परंतु अल्पावधीतच त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली काम करणारा स्वत:चा वेगळा गट तयार करण्यापर्यंत प्रगती केली.

क्रांतिसिंह नाना पाटीलांशी निर्माण झालेल्या नातेसंबंधामुळे भगवानराव पाटील यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्याच्या दृष्टीने अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली. हे खरे असले तरी त्यांच्यावर राष्ट्रभक्तीचे व सार्वजनिक कार्याचे संस्कार बालपणापासून झाले होते. भगवानराव पाटील यांचे वडील नानासाहेब मोरे—पाटील हे प्रथमपासून कॉंग्रेसचे एक कार्यकर्ते होते. त्यांना सामाजिक कार्याची आवड होती. त्यांनी आपल्या काही साथीदारांच्या सहकार्याने १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीपासून हणमंतवडिये गावात कॉंग्रेसच्या कार्याला सुरूवात केली होती.

वडिलांनी केलेल्या संस्कारामुळे भगवानराव पाटील विद्यार्थीदशेपासूनच सार्वजनिक कार्यात रस घेऊ लागले होते. सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या काळात गावातून प्रभातफेऱ्या काढणे, तरूण वर्गात जागृती निर्माण करणे वगैरे कामात त्यांनी पुढाकार घेतला होता. पुढे क्रांतिसिंहाच्या सहवासात आल्यावर तर हे संस्कार अधिकच दृढ झाले. त्यामुळे 'चले जाव' चळवळीत भगवानराव पाटील यांनी क्रांतिसिंह नानांच्या पावलावर पाउल टाकून आपल्या कुवतीनुसार चळवळीची जबाबदारी उचलण्याची तयारी दाखविली.[२] आंदोलने सुरू होताच त्यांनी आपल्या पत्नीसह खानापूर तालुक्याची हद्द ओलांडली व कुंडल, दुधोंडी गाठले.

क्रांतिकार्यात सहभागी होण्यासाठी कुंडल, दुधोंडी भागांत गेलेल्या भगवानराव पाटील यांनी सुरूवातीचे थोडे दिवस चळवळीचे तत्वज्ञान, कार्यक्रम, कार्यपध्दती वगैरेचे बारकाईने निरीक्षण केले, राजकारणाचा अभ्यास केला. नंतर केवळ चळवळीतील आपल्या नातलगांच्या छायेतच वावरण्याऐवजी त्यानी स्वतंत्रपणे काही माणसे जमविली आणि प्रत्यक्ष कार्याला सुरूवात केली. तसेच बुर्ली, आमनापूर, पलूस, दुधोंडी वगैरे गावातील प्रमुख मंडळीशी संपर्क प्रस्थापित केला व त्यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध जोडले. त्यांच्या कार्यात ते सहभागी होऊ लागले. अशा प्रकारे या चळवळीत भगवानराव पाटील यांनी स्वत:चे असे स्थान व अस्तित्व निर्माण केले. त्यामुळे चळवळीतील प्रमुख नेत्यांमध्ये त्यांची गणना होऊ लागली.

**राष्ट्रीय कामगार संघटनेचे कार्य :**

भगवानराव पाटील, बाळकू अण्णा मोहिते व इतर कार्यकर्त्यांनी अहोरात्र मेहनत करून सातारा जिल्हा राष्ट्रीय संघाला एका प्रभावी व भक्कम संघटनेचे स्वरूप प्राप्त करून दिले. मुंबईतील सातारा, सांगली, कोल्हापूरकडील कामगारांवर, विशेषत: गिरणी कामगारांवर, त्या वेळी या संघटनेचा फार मोठा प्रभाव होता. भगवानराव पाटील व मोहिते अण्णा यांनी कल्याण, ठाणे, दादरपासून बोरी बंदरपर्यंत मराठी कामगारांच्या वस्तीमध्ये फिरून त्यांना या संघटनेत सामील करून घेतले होते. या कामगारांच्यात राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्यास आणि त्यांना राष्ट्रीय कार्याकडे वळविण्यास सातारा जिल्हा राष्ट्रीय संघाचा मोठाच हातभार लागला होता. भगवानराव पाटील भूमिगत कार्यकर्ते म्हणून वावरत असतानाही त्यांनी टोपण नावाने जाहीर सभातूनही भाषणे केली. खासगी बैठका घेऊन कामगारांमध्ये प्रबोधन करण्याचे कार्य तर नेहमीच चालू होते. काही प्रमुख भूमिगत नेत्यांच्या बैठका त्यांनी आयोजित केल्या होत्या.[३]

**शेतकरी कामगार पक्षातील कार्य:**

१९४९ च्या नोव्हेंबर महिन्यात भगवानराव पाटील यांनी कॉंग्रेस सोडून शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. १९५७ च्या निवडणुकीत भगवानराव पाटील शेतकरी कामगार पक्षाच्या तिकिटावर संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार म्हणून उभे राहिले. मराठी माणसावर झालेल्या अन्यायाची चीड व त्यातून झालेली जनजागृती वगैरेमुळे भगवानराव पाटील सहज विजय झाले.

**आमदार असताना केलेले कार्य :**

भगवानराव पाटील १९५७ ते १९६२ अशी पाच मुंबई राज्याच्या व महाराष्ट्राच्या विधानसभेचे सभासद होते. तथापि जनतेचे प्रतिनिधी या नात्याने आपणावर पडलेली जबाबदारी पार पाडण्यास आपण बांधील आहोत, अशी त्यांची धारणा होती. म्हणून संधी मिळेल तेव्हा सभागृहात वेगवेगळ्या प्रश्नांवर आपले विचार व्यक्त करण्याचे कर्तव्य त्यांनी बजावले होते. तसेच आपल्या मतदारसंघात महत्वाच्या व जनतेच्या

जिव्हाळ्याच्या बाबींवर सरकारला वेळोवेळी प्रश्न विचारून त्या बाबी सरकारच्या निदर्शनास आणून देण्याचे कामही त्यांनी केले होते.[४]

**असद येथील इनाम जमिनींचा प्रश्न सोडविला :**

खानापूर तालुक्यातील असद या गावच्या साठ–सत्तर शेतकऱ्यांकडे लागवडीसाठी दोन–तीनशे एकर इनामी जमीन होती. तिचे कायद्याप्रमाणे सरकारी देणे वेळेवर न भागविल्याने त्या काळात शेतकऱ्यांवर अडीच तीन लाख रूपये देणे निघाले होते. हे देणे भरा किंवा जमिनी सरकारला परत करा असा पेच सरकारने त्या शेतकऱ्यांपुढे निर्माण केला होता. भगवानराव पाटील यांनी हा प्रश्न विधानसभेत धसाला लावलाच; पण विधानसभे बाहेरही श्री. मोहिते अण्णांच्या सहकार्याने त्या भागातील शेतकऱ्यांचे व्यापक शिष्टमंडळ संबंधित मंत्र्यांकडे नेऊन त्यांच्यापुढे शेतकऱ्यांनी बाजू प्रभावीपणे मांडली व सरकारी देणे माफ करून घेतले. तसेच त्या जमिनी शेतकऱ्यांच्या कायम मालकीच्या करून दिल्या.[५]

**सवर्ण नवबौध्द संघर्ष :**

इ.स. १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हजारो अनुयायांसह हिंदू धर्माचा त्याग करून बौध्द धर्म स्वीकारला. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात पसरलेल्या बाबासाहेबांच्या अनुयायांनीही बाबासाहेबांचे अनुकरण केले. या नवबौध्द मंडळींनी गावकीची कामे करण्यास नकार दिल्याने नवबौध्द व सवर्ण यांच्यात बऱ्याच ठिकाणी संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. काही गावांत तर त्यावरून संघर्ष उद्‌भवण्याची चिन्हे दिसू लागली. परंतु क्रांतिसिंह नाना पाटील व भगवानराव पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह तातडीने अशा गावांना भेटी दिल्या.[६] त्यांनी सवर्ण हिंदूना हे पटवून दिले की नवबौध्दांनाही त्यांच्या इच्छेनुसार निर्णय घेण्याचा हक्क आहे. तसेच त्यांची दोन्ही समाजातील लोकांना एकत्र आणून त्यांची समजून घातली व त्यांच्यातील परस्परांविषयीचे गैरसमज दूर केले.

**गिरणी कामगार विषयक कामकाज :**

भगवानराव पाटील आमदार झाल्यावर त्यांना वर्षातून बरेच दिवस मुंबईत वास्तव्य करावे लागे. त्या वेळी मुंबईत गिरणी कामगार क्षेत्रात कम्युनिस्टप्रणित लाल बावटा गिरणी कामगार युनियनचे वर्चस्व होते. संयुक्त महाराष्ट्राच्या मुंबईत झालेल्या अभूतपूर्व आंदोलनात हेच गिरणी कामगार आघाडीवर होते, तेव्हा गिरणी कामगारांवर असलेल्या कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव मोडून काढण्यासाठी भांडवलदाराचे पाठीराखे मुंबई कॉंग्रेस नेते श्री. स. का. पाटील विशेष प्रयत्नशील होते.[७] त्यांनी त्या कार्याकरीता मुंबईतील गुंड शक्तीचीही मदत घेतली होती. त्या वेळी शे.का.पक्षाने लाल बावटा गिरणी कामगार युनियनला पाठिंबा देण्याचा व ती संघटना बळकट बनविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शे.का.पक्षाचे आमदार जी. डी. लाड, भगवानराव पाटील इत्यादींनी गिरणी कामगार लक्ष घातले. त्यांनी विशेषतः घाटावरील सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या भागांतील कामगारांना लाल बावटा गिरणी कामगार युनियनच्या झेंड्याखाली आणण्याचे प्रयत्न केले व त्यात ते यशस्वीही झाले.[८]

**शैक्षणिक कार्य :**

भैरवनाथ विद्यार्थी वसतिगृह, विटे, बळवंत कॉलेज व विटा हायस्कूल या शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत व त्यांच्या विकासात भगवानराव पाटील यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**संयुक्त महाराष्ट्र निर्मिती लढा :**

खानापूर तालुक्यात शे.का.पक्षाने भगवानराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा लढा अत्यंत हिरीरीने लढविला. या प्रश्नसाठी विटा येथे तालुका कचेरीवर अनेक वेळा मोर्चे आयोजित करण्यात आले. तसेच जथ्याजथ्याने सत्याग्रहाची मोहिम दीर्घकाळ चालविण्यात आली. या प्रसंगी भगवानराव पाटील यांनी संपूर्ण तालुका ढवळून काढला. त्यामुळे तालुक्यातील जनतेने सत्याग्रह व मोर्चाच्या कार्यक्रमात अत्यंत उत्साहाने भाग घेतला.[९] तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाच्या लढ्यात भगवानराव पाटील यांनी भाग घेतला.

**अन्नधान्याचा लढा :**

१९५६ सालचा अन्नधान्य प्रश्नावरचा लढा म्हणून ओळखला जाणारा लढा चिरस्मरणीय ठरला. त्या वेळी आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नव्हता. लोकांना स्वस्त दराच्या दुकानांमार्फत अन्नधान्य पुरविले जात असे; पण ते गरजेपेक्षा खुपच अपुरे असे. तशातच शेतकऱ्यांवर लेव्हीरूपाने सरकारला धान्य विकण्यासाठी सक्ती केली जात असे; पण सरकार त्यासाठी शेतकऱ्यांना अत्यंत कमी भाव देत असे. तेव्हा महाराष्ट्रातील डाव्या पक्षांनी लेव्ही धान्याला योग्य भाव मिळाला पाहिजे आणि गरजू लोकाना दरमहा, दर माणसी किमान १२ किलो धान्य स्वस्त दराच्या दुकानांतून पुरविले पाहिजे, या दोन प्रमुख मागण्या घेऊन महाराष्ट्रभर प्रचंड लढा उभारला. या लढ्याच्या वेळी कोल्हापूर शहरात डाव्या पक्षांनी आयोजित केलेल्या सत्याग्रहाला हिंसक वळण लागले. जनतेच्या असंतोषाने उग्र स्वरूप धारण केले. परिस्थिती काबूत आणण्यासाठी पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्यात सहाजणांना हौतात्म्य प्राप्त झाले.

महाराष्ट्रात इतर ठिकाणीही या लढ्याला जनतेचा भरघोस प्रतिसाद लाभला. जनआंदोलनाचे हे उग्र स्वरूप पाहून महाराष्ट्र सरकारने डाव्या पक्षांच्या अनेक नेत्यांना प्रतिबंधक स्थानबध्दता कायद्याखाली अटक करून तुरूंगात टाकले. क्रांतिसिंह नाना पाटील त्या वेळी प्रचारासाठी खानापूर तालुक्यात आले होते. पोलिसांनी त्यांच्यासह भगवानराव पाटील, गोविंदराव मिरगे, भागवत वकील, जोगळेकर वकील, इ. प्रमुख कार्यकर्त्यांना रातोरात अटक करून त्यांची येरवड्यास रवानगी केली.

तथापि नेत्यांना अटक केली तरी खानापूर तालुक्यातील शे.का.पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आठवडाभर दररोज विटे येथील मामलेदार कचेरीवर प्रचंड मोर्चे नेऊन हा लढा चालूच ठेवला. या वेळी सदाशिवराव पारेकर हे शिताफीने अटक चूकवून दोन महिने फरारी राहिले आणि मोर्चाचा कार्यक्रम यशस्वी करण्यात त्यांनी सिंहाचा वाटा उचलला.[१०] शेवटी १९६५ चे भारत—पाकिस्तान युध्द सुरू झाल्याने हा लढा पाठीमागे घेण्यात आला.

**दुष्काळ विराधी लढे :**

१९७२ साली महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला. खानापूर तालुक्यासारख्या सतत अवर्षणग्रस्त असलेल्या भागातील परिस्थिती तर खूपच भयानक होती. या दुष्काळी परिस्थितीत खानापूर तालुक्यातील जनतेने भगवानराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड लढे उभारले. भगवानराव पाटील यांनी तालुक्यातील दुष्काळग्रस्त जनतेला संघटीत केले आणि सरकारने दुष्काळी कामे सुरू करावीत, दुष्काळी कामावरील मजुरांना योग्य मजुरी द्यावी, जनतेला अन्नधान्याचा पुरेसा पुरवठा करावा, जनावरांना चारा उपलब्ध करून द्यावा. कूपनलीका खोदाव्यात, नळपाणीपुरवठा योजना सुरू कराव्यात, गरजू गावांना टॅकर पाणी पुरवावे, शेतसारा माफ करावा, शेतकऱ्यांच्या कर्जाची वसुली थांबवावी व त्यावरील व्याज माफ करावे इ. मागण्या हाती घेऊन सरकारशी आणि सरकारी यंत्रणेशी सतत संघर्ष चालू ठेवला. या कालावधीत भगवानराव पाटील यांनी सत्याग्रह, मोर्चे, जेल भरो, वाहतूक रोखणे, निदर्शने यांसारखे अनेक कार्यक्रम आखून दुष्काळी भागातील जनतेची गाऱ्हाणी सरकारच्या वेशीवर टांगली.[११]

**जनावरांची छावणी:**

१९८७ मध्ये भगवानराव पाटील यांनी आपल्या हणमंतवडिये गावी मा. पी. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्याने दोन—अडीच हजार जनावरांची प्रचंड छावणी उभारली. महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी भारतातील सर्वात मोठी जनावरांची छावणी म्हणून या छावणीचे वर्णन करून तिला छायाचित्रासह मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी दिली.[१२] ही छावणी म्हणजे भगवानराव पाटील यांच्या एकूण कामातील मानाचा शिरपेच ठरेल, या छावणीने हजारो जनावरांना जीवदान दिले असे म्हणता येईल.

**निष्कर्ष:**

भगवानराव पाटील यांनी केलेल्या सार्वजनिक कार्याकडे व त्यांच्या एकूणच जीवनाकडे पाहिले तर त्यांच्या वेगळेपणाची आणि असामान्यत्वाची आपणास खऱ्या अर्थाने जाणीव होते. भगवानराव पाटील यांनी कधीही नेतृत्वाची अपेक्षा केली नाही. समाजाचे व पक्षाचे प्रामाणिकपणे कार्य करीत राहणे हेच त्यांनी आपले एकमेव उद्दिष्ट मानले. दुष्काळ कालावधीत भगवानराव पाटील यांनी सत्याग्रह, मोर्चे, जेल भरो, वाहतूक रोखणे, निदर्शने यांसारखे अनेक कार्यक्रम आखून दुष्काळी भागातील जनतेची गाऱ्हाणी मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले दिसून येते.

**संदर्भ:**

१. पाटील सुभाष, (संपा.), भाई पाटील भगवानराव बाप्पा, गौरवग्रंथ, क्रांतिवैभव प्रकाशन, हणमंतवडिये, जि. सांगली., ४ मे १९८८, पृ. २५.

२. कित्ता, पृ. २८.

३. मुलाखत : ॲड. सुभाष पाटील, विटा, दि. १३/१२/२०१५

४. पाटील सुभाष, उपरोक्त, पृ २७.

५. मुलाखत : ॲड. सुभाष पाटील, विटा, दि. १३/१२/२०१५

६. पाटील सुभाष, उपरोक्त, पृ ४२.

७. शिवणीकर राघव, सातारचा सिंह : क्रांतिसिंह नाना पाटील समग्र चरित्र, एस.एम. अधाटे पब्लिकेशन पूणे, ऑगस्ट १९८६, पृ. ८३—८४.

८. शिवणीकर राघव, उपरोक्त, पृ ८७

९. शिवणीकर राघव, सातारचा सिंह : क्रांतिसिंह नाना पाटील समग्र चरित्र, एस.एम. अधाटे पब्लिकेशन पूणे, ऑगस्ट १९८६, पृ. ८३—८४.

१०. दै. सकाळ, दि. ७/६/२००१ पृ. २.

११. पाटील सुभाष, उपरोक्त, पृ. ३२.

१२. दै. लोकमत, ७/६/२००१, पृ. ३.